ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

# नवीन शैक्षणिक धोरण २०२० – मूल्यशिक्षण आणि तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता

* डॉ. प्रिया मंगेश वैद्य,

* प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ

**प्रस्तावना:**

तत्त्वज्ञान आणि शिक्षण यांचा संबंध एकमेकांशी दृढ आहे. शिक्षणाचा पाया तत्त्वज्ञान आहे. तत्त्वज्ञानाचे बाह्य आणि आंतरिक स्वरूप (शिक्षण : औपचारिक आणि अनौपचारिक) जीवनाविषयीचा दृष्टिकोन घडविणारे आहे. 'शिक्षण' या शब्दाचे विविध अर्थ / व्याख्या आहेत. व्यक्तीमध्ये आमूलाग्र बदल आणण्याचे कार्य शिक्षणाद्वारे होते. म्हणजेच शिक्षण हे त्याचे महत्त्वाचे ध्येय / उद्दिष्ट ठरते. व्यक्तीच्या विचारांमध्ये आणि त्याच्या वर्तनात अपेक्षित बदल आणण्याचे काम तत्त्वज्ञानकेंद्री शिक्षणाद्वारे होऊ शकते. शिक्षणाची व्याप्ती आणि रुंदी वाढविण्यासाठी तत्त्वज्ञानाची बैठक आवश्यक आहे. असे झाले तर परिवर्तनशील जीवनाच्या घटकांचा योग्य प्रकारे विस्तार होईल; परिणामी व्यक्ती आणि समाजाची प्रगती होईल. राष्ट्र आणि संस्कृतीचे बंध शिक्षणामुळे अधिक घट्ट होतील. एक नवा समाज निर्माण करण्यासाठी, मूल्याधारित समाज घडविण्यासाठी त्याचा योग्य उपयोग निश्चित होईल.. याचा विचार आणि त्याला अनुसरून प्रक्रिया प्राचीन भारतात - गुरुकुल शिक्षणाद्वारे काही प्रमाणात होताना दिसली. प्राचीन भारतातील जीवनविषयक दृष्टिकोनाचा आणि तत्त्वज्ञानाचा यात महत्त्वाचा वाटा होता. व्यक्तिविकास, समाजप्रबोधन, कर्तव्यपूर्ती आणि राष्ट्रप्रेम यांच्याशी संबंधित काही महत्त्वाचे घटक शिक्षणात अनुस्यूत आहेत. प्राचीन भारतातील आणि आधुनिक भारतातील शिक्षणप्रणाली / शिक्षणावर त्या त्या काळाचा, परिस्थितीचा आणि वैश्विक विचारांचा प्रभाव पडला; हे स्वाभाविकच होते. जसे, ब्रिटिश राजवटीत भारतातील शिक्षणावर त्यांच्या विचारांचा प्रभाव अधिक झाला. यामुळेच भारतातील  शिक्षण भारतीय राहिले नाही. वैचारिक पारतंत्र्य शिक्षणाद्वारे पसरले. भारतीय संस्कृतीचे शिक्षणातील स्थान संपुष्टात आले. त्यामुळेच कारकुनाची निर्मिती करणारे ब्रिटिश शिक्षण भारतात सर्वत्र दिसू लागले. एखाद्या महामारीपेक्षाही त्याचे परिणाम वाईट होते. तसे असले तरी याच काळात काही भारतीयांनी याच शिक्षणाला

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

श्रेष्ठ तर मानलेच, पण ब्रिटिश साम्राज्याविषयी प्रेम आणि आस्थाही व्यक्त केली. ब्रिटिश शिक्षण-विचारांनी झपाटलेला भारतातील उच्चभ्रू समाज भारतातील प्रबोधन होण्यास मज्जाव करत होता. भारतीय संस्कृती, भारतीय विचार याविषयी आकस आणि शंका निर्माण करणारा एक विशिष्ट समाज - भारताच्या स्वातंत्र्यानंतरही प्रामुख्याने कार्यरत होता. स्वतंत्र भारतात वेगवेगळ्या शैक्षणिक आयोगांद्वारे भारतीय शिक्षण विचार आणि प्रणाली थोड्या प्रमाणात विकसित झाल्या; पण खेदाची गोष्ट ही, की त्याचे स्वरूप (प्रकट) कृतीत प्रकर्षाने दिसले नाही. भारतीय शिक्षणाचा अभाव गेली अनेक वर्षे जाणवला आणि त्याचे परिणाम कमी-अधिक प्रमाणात

व्यक्ती आणि राष्ट्राच्या जडणघडणीत नुसतेच दिसले नाहीत; ते अनेक पिढ्यांपर्यंत आजही दिसत आहेत.

अनेक दशकांनंतर तेव्हा (स्वातंत्र्यानंतर) अभिप्रेत असलेली भारतीय शैक्षणिक धोरणांची बांधणी आणि अंमलबजावणी आता सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तयार झाले आणि भारताच्या वेगवेगळ्या राज्यात काही प्रमाणात त्याची अंमलबजावणी होऊ लागली. वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञांनी एकत्रित येऊन हे कार्य परिपूर्तीकडे नेण्याचा प्रयत्न केला. हे करताना त्या धोरणाचे ध्येय / त्याचे उद्दिष्ट समजून घेणे आवश्यक तर आहेच; ते समजून घेतल्यावर ते अधिक कसोशीने राबवणे त्याहून महत्त्वाचे आहे.

सद्यःस्थितीत भारतीय शिक्षणक्षेत्रात माहिती आणि जे उपयोगी आहे त्याला अधिक वाव आणि महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे शिक्षणाचे स्वरूपदेखील 'माहिती देणारे आणि जीवनासाठी उपयोगी असणारे' असे झाले आहे. उदाहरणार्थ, नोकरी देणारे, केवळ ऐहिक सुखाकडे आकर्षित करणारे शिक्षण. असे याचे स्वरूप त्या त्या परिस्थितीमुळे झाले असले तरीही या दृष्टीकोनात मूलभूत परिवर्तन होणे अत्यंत गरजेचे आहे. नवीन शिक्षणप्रणाली २०२०च्या द्वारे ह्या मूल्याधारित परिवर्तनावर विशेष भर दिलेला आहे. भारतीय तत्त्वज्ञानाधारित दृष्टिकोन हा या नवीन शिक्षणप्रणालीचा मूळ गाभा आहे.

शिक्षणप्रणाली 2020मध्ये अनुस्यूत असलेली 'भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित मूल्याधारित शिक्षणव्यवस्था हा एक भक्कम पाया कसा ठरू शकेल' यावर या शोधनिबंधात विवेचन केले आहे. तत्त्वज्ञानाच्या शिक्षकांनी नेमकी कुठली भूमिका घेतली पाहिजे आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय नसलेल्या शिक्षकांना कसे मार्गदर्शन करता येईल, यावरील विश्लेषण हा देखील या शोधनिबंधाचा एक महत्त्वाचा भाग आहे. हा शोधनिबंध नवीन शैक्षणिक धोरण २०२० याचे केवळ तात्त्विक स्वरूपच मांडणार नाही, तर विशेषकरून तत्त्वज्ञानाचे शिक्षकांनी अन्य शिक्षकांना परिवर्तनशील शिक्षणासंबंधी कसे मार्गदर्शन करावे हे मांडण्यावरही भर दिला आहे.

ह्या शोधनिबंधाचे चार भाग आहेत.

I. तत्त्वज्ञान आणि शिक्षण
II. भारतीय तत्त्वज्ञान आणि भारतीय शिक्षण : एक आढावा
III. नवीन शिक्षणपद्धती : भारतीय तत्त्वज्ञान आणि मूल्याधारित दृष्टिकोन
IV. नवीन शिक्षणप्रणाली २०२० : अंमलबजावणीत तत्त्वज्ञानातील शिक्षकांचे अपेक्षित योगदान

## I. तत्त्वज्ञान आणि शिक्षण:

मानवी जीवन परिपक्व करण्यात शिक्षणाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. विचार आणि वर्तनातील बदल यामुळेच हे शक्य आहे. भारतीय परंपरेतील तत्त्वज्ञानाच्या वेगवेगळ्या प्रणाली म्हणजे दर्शनं. आयुष्य जगताना येणाऱ्या संकटांमध्ये तत्त्वज्ञान आपल्याला मोलाची मदत करते. तत्त्वज्ञानाच्या सखोल अभ्यासामुळे वैचारिक सुस्पष्टता, निरपेक्ष वृत्ती, नीति आणि मूल्यांचे संगोपन आणि संवर्धन याची जाणीव होते; परिणामी व्यक्तिमत्त्वात बदल घडविण्यास आणि व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्यासाठी याचा हातभार लागतो.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

काही विचारवंतांनी आणि तत्त्वज्ञान्यांनी 'तत्त्वज्ञान आणि शिक्षण' यामधील साम्य आणि नातंही आपल्या विचारांद्वारे व्यक्त केलं आहे. शिक्षणाद्वारे प्रस्थापित झालेले विचार अथवा दृष्टिकोन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास हातभार लावतात.

1) **माहिती आणि परिवर्तनशील विचार: शिक्षण**

कला, कौशल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, संस्कृतीविषयी ममत्व या गोष्टी शिक्षणातून व्यक्त होणे अपेक्षित आहे.योग्य शिक्षणाला तत्त्वज्ञानाची आणि संस्कृतीची बैठक आवश्यक आहे. यामुळेच वैचारिक दृष्टिकोन आणि जीवनातील समस्या सोडविण्याचे महत्त्वपूर्ण कौशल्य अंगी बाणले जाते.

2) **नीती आणि नैतिकतेचे स्वरूप आणि महत्त्व:**

नीती आणि नैतिकतेचे स्वरूप तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून स्पष्ट होते. नीती आणि नैतिकता या मूल्यांची विद्यार्थ्यांमध्ये जोपासना करण्यासाठी शिक्षणाचा मार्ग योग्य आहे. शिक्षणाद्वारे ज्ञानसंपदा वाढते आणि याचाच परिणाम बऱ्याचदा नैतिक कृतींतून दिसू लागतो. तत्त्वज्ञान आणि शिक्षणामधला परस्परसंबंध मजबूत असला तर योग्य ज्ञान आणि जीवनमूल्यांची जोपासना होणे स्वाभाविक आहे.

3) **शिक्षणाला तत्त्वज्ञानाचे मार्गदर्शन आवश्यक:**

तत्त्वज्ञानाशिवाय शिक्षण अपुरं आहे; तत्त्वज्ञानाच्या सहयोगाशिवाय शिक्षणाची पातळी अधोगतीला जायला वेळ लागणार नाही. तत्त्वज्ञानविरहित शिक्षण देणे म्हणजेच समाजाचे अध:पतन होण्यास आमंत्रण देणे होय.

4) **शिक्षण-प्रक्रिया आणि तत्त्वज्ञानाचे मार्गदर्शन:**

योग्य शिक्षणाचे उगमस्थान तत्त्वज्ञान आहे. ते तसे असले तरी तत्त्वज्ञानाची भूमिका तेवढ्यापुरती सीमित नाही. जीवनविषयक आकलन उत्कृष्ट अध्यापनाशिवाय शक्य नाही. कुठल्या प्रकारचे शिक्षण देणे जरुरी आहे आणि कुठल्या वयोगटाला आणि कशाप्रकारे ते देणे अभिप्रेत आहे हे सगळे महत्त्वपूर्ण आहे.

5) **ध्येयपूर्ती :**

तत्त्वज्ञान आणि शिक्षण ही केवळ माहिती देणारी यंत्रणा नसून जीवनाच्या ध्येयपूर्तीविषयी विचार, ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक जीवन-दृष्टिकोन, परिश्रम इ. याचे मार्गदर्शन शिक्षणाद्वारे होते. ते मार्गदर्शन जरी शिक्षणाद्वारे होत असले तरीही त्याला योग्य दिशा दाखवण्याचे काम तत्त्वज्ञानाच्या मार्गाने होणे आवश्यक आहे. याचाच सरळ सोपा अर्थ असा की, आवश्यक मनन, चिंतन आणि चर्चा झाली की शिक्षणाचे स्वरूप प्रभावशाली तर होतेच, पण ते प्रगतिशील व्हायला एक मार्ग खुला होतो.

6) **तत्त्वज्ञान आणि शिक्षण : पूरक स्वरूप**

तत्त्वज्ञान आणि शिक्षण यांचे योगदान सारखेच महत्त्वाचे आहे. कुणा एकाला झुकते माप देणे अयोग्य ठरेल. म्हणजेच तत्त्वज्ञान आणि शिक्षण यांचे नाते एकमेकांच्या प्रगतीसाठी पूरक आहे. केवळ तत्त्वज्ञानाचाच विचार केला, खूप चर्चा केल्या परंतु या

सगळ्यातून काहीच शक्य नसेल किंवा वैचारिक पातळी – विचार व्यक्ती आणि समाजावर काहीच परिणाम होत नसेल तर ते तत्त्वज्ञानाच्या प्रगतीसाठी थोड्याफार प्रमाणात घातक ठरू शकते. ते कसे? जर विशेष विचार केवळ एकाच विचारांचे समर्थन करत असतील तर हे अधिक घातक आहे किंवा विचारांना जर जीवन अनुभवांची जोड नसेल तर ते केवळ बुद्धीच्या विकासापुरतेच सीमित राहील. पण हे तत्त्वज्ञानाचे परिपूर्ण स्वरूप नाही!

जीवनाशी निगडित किंवा जीवन समृद्ध करणारे तत्त्वज्ञान केवळ वैचारिक बैठकीत विचारांपुरते मर्यादित नको. त्याचा प्रभाव शिक्षणाद्वारे मजबूत आणि महत्त्वपूर्ण ठरू शकतो. शिक्षण योग्य तत्त्वज्ञानाशिवाय काही उपयोगाचे नाही. विचारांची जोड जर कृतीत / अनुभवात येत नसेल तर त्या शिक्षणाला फारसे महत्त्व देण्यात काही अर्थ नाही. शिक्षण आणि तत्त्वज्ञान याचा सहयोग योग्य प्रकारे असला तरच ते शिक्षण परिपूर्ण होऊ शकते. अन्यथा शिक्षण आणि जीवनाची फारकत होऊ शकते. अशा शिक्षणामुळे कुठलीही वैचारिक पातळी सुधारण्यास अजिबात मदत होणार नाही. प्रगतिशील समाज घडवणे ही तत्त्वज्ञानाची आणि शिक्षणाची एकत्रित जबाबदारी असते.

7) **तत्त्वज्ञान आणि शिक्षण : संस्कृतीचा दुवा**

तत्त्वज्ञान आणि शिक्षण यांची वीट घट्ट करण्याचे काम देशाच्या संस्कृतीमुळे होऊ शकते. वैचारिक प्रगल्भता आणि संस्कृतीचा प्रभाव यामुळे जीवनशैलीवर परिणाम होतो. उत्तम जीवन-दृष्टिकोन वेगवेगळ्या देशांच्या संस्कृती-दर्शनातून घडतो. यामुळेच त्याचा प्रभाव तत्त्वज्ञानावर आणि शिक्षणावर स्वाभाविकपणे दिसतो. त्यामुळे तत्त्वज्ञान हे शिक्षणाचे मूळ स्वरूप आहे. देशाची संस्कृती परिवर्तनशील जीवन दृष्टिकोनाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. यामुळे तत्त्वज्ञान आणि संस्कृती जेवढे विचारांमध्ये समृद्ध असेल तेवढे शिक्षण महत्त्वपूर्ण आणि प्रगतिशील होण्यास मदत होऊ शकते.

सांस्कृतिक जीवनदृष्टी तत्त्वज्ञानाची व्याप्ती व्यापक करण्यास मदत करतात. संस्कृतीचे आकलन स्पष्ट करण्यासाठी त्यामधील तत्त्वप्रणालीचे महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे सांस्कृतिक दृष्टिकोन समृद्ध होऊ शकतो.

8) **तत्त्वज्ञान आणि शिक्षण – जीवनविषयक भूमिका स्पष्ट करण्याचा मार्ग :**

जीवन सहज, सोपे नाही. जीवनाचा दृष्टिकोन समजणे आणि तो जोपासणे त्याहून अवघड आहे. यासाठीच शिक्षणाद्वारे (वेगवेगळ्या विषयांच्या मदतीने) ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येऊ शकते. त्यामुळेच त्यांना जीवन-आकलनात सुस्पष्टपणा आणि सामंजस्य निर्माण करायला योग्य ती मदत होऊ शकते. यामुळेच व्यक्ती आणि विकासाचे नाते स्पष्ट होईल. समाजाविषयी आस्था आणि आत्मीयता निर्माण करायला अजून एक संधी मिळू शकते!

9) **तत्त्वज्ञान आणि शिक्षण – बदलत्या काळाचा परिणाम:**

जगातील बदलत्या घटनाक्रमामुळे विचारप्रवाहावर त्याचा परिणाम झालेला दिसतो. याचा प्रभाव मानवी जीवनावर झाला. या बदलामुळे तत्त्वज्ञानाच्या विचार-दृष्टिकोनावर परिणाम झाला.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

उदाहरण – 18व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंड, युरोप आणि जगाच्या इतर भागात त्याचे परिणाम दिसले. औद्योगिक प्रगती झाली. यांत्रिक जीवन अधिक प्रमाणात दिसू लागले. शिक्षणपद्धतीत सकारात्मक आणि नकारात्मक बदल दिसले.

यांत्रिक ज्ञान वाढविणाऱ्या शिक्षणाला अधिक महत्त्व मिळू लागले. यामुळे नोकरी मिळायला देखील मदत झाली. परंतु ज्या शिक्षणामुळे मानवी मनातील संवेदनशीलता वाढविण्याकडे कल होता – अशा प्रकारच्या शिक्षणाला / विशिष्ट विषयांना कमी महत्त्व प्राप्त झाले. यामुळेच जीवनमूल्ये, उत्तम जीवन-दृष्टिकोन, शिक्षणातून घडणारा संवाद, विचारमंथन हळूहळू संपुष्टात आले. तत्त्वज्ञानाचे महत्त्व कमी अधिक प्रमाणात दुर्लक्षित अवस्थेत होते. साहजिकच माणसा-माणसांमधील सुसंवाद थांबला; वैचारिक दरी निर्माण होऊ लागली. जे उपयुक्त / उपयोगी त्याला जास्त महत्त्व मिळू लागले. याचा परिणाम जीवनमूल्ये जोपासण्याच्या प्रक्रियेवर तर झालाच, परंतु तत्त्वज्ञानामुळे तीक्ष्ण विचार-प्रगल्भता कमी झाली. जीवनविषयक प्रश्न उपस्थित करण्याची संधी औद्योगिक क्रांतीमुळे घडलेल्या शिक्षण विचारात हरवून गेली. त्याचे महत्त्व कमी झाले. ही परिस्थिती व्यक्तिविकास आणि सामाजिक प्रगतीसाठी अतिशय घातक होती. अठराव्या शतकाच्या अखेरीस तत्त्वज्ञानाचे स्वरूप बदलून गेले. पुढे विसाव्या शतकातदेखील वैचारिक प्रगती झाली. याचा परिणाम शिक्षण आणि संस्कृतीवर प्रकर्षाने दिसू लागला.

## II. भारतीय तत्त्वज्ञान आणि भारतीय शिक्षण : एक आढावा

To build a new India, we must think deeply and plan wisely. India should have a national system of education.[1]

### १) प्राचीन शिक्षणप्रणाली:

प्राचीन भारतातील शिक्षणावर भारतीय तत्त्वज्ञानाचा आणि भारतीय संस्कृतीचा प्रभाव होता. गुरू-शिष्य शिक्षणपद्धती प्राचीन भारतातील शिक्षणाचा महत्त्वाचा घटक होता. या शिक्षणाची बैठक आध्यात्मिक होती आणि जीवन-दृष्टिकोन नैतिक होता.
या कालखंडात शिक्षण सर्वांसाठी मुक्त, खुले होते. या शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य विद्यार्थ्यांमधील अज्ञान कमी करण्याचे होते. जीवनमूल्याधारित जीवन-दृष्टिकोनावर भर होता. शारीरिक आणि मानसिक विकास करण्यावर भर होता. गुरुकुलात गुरूच्या सान्निध्यात आणि मार्गदर्शनामुळेच शिष्याचा व्यक्तिमत्त्व-विकास होत असे. एक उत्तम व्यक्ती घडवण्याचे कार्य गुरूंच्या मार्गदर्शनामुळे शक्य होत होते. गुरू-शिष्य शिक्षणपरंपरेत ज्ञानाचे उत्कृष्ट आकलन आणि आदर्श वर्तणूक जोपासण्यासाठी आवश्यक दिशा दाखविण्याचे कार्य गुरू करत असत.

### 2) उत्तर वैदिक काळातील शिक्षण:

हा कालखंड सुमारे इ.स.पूर्व 1200 ते इ.स.पूर्व 600 पर्यंत मानला जातो. या काळात आमूलाग्र बदल सामाजिक, राजकीय आणि धार्मिक जीवनात दिसून आले. शिक्षण सगळ्यांसाठी नव्हते. आश्रमपद्धती या काळात प्रस्थापित झाली. वेदशास्त्र, नीतिशास्त्र याचा त्यात समावेश होता.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

3) **बौद्धकालीन शिक्षणप्रणाली:**

या कालखंडात विद्यापीठांची स्थापना ही भारतीय शिक्षणाच्या प्रगतीसाठी महत्त्वाची मानली जाते. उदा., तक्षशिला, नालंदा इत्यादी प्रशस्त विद्यापीठांची स्थापना याच काळात झाली. महत्त्वाच्या विषयांच्या व्यतिरिक्त धर्मशास्त्र, शिल्पकला, हस्तकला, वास्तुकला इत्यादीचे शिक्षणही विद्यापीठातून दिले जात असे.

4) **मध्ययुगीन कालखंड:**

इ.स.1200 ते इंग्रज भारतात येण्यापूर्वीचा कालखंड मानला जातो. याच दरम्यान या काळात महाराष्ट्रातील संतपरंपरेने मोलाचे कार्य केलेले दिसते. थोर संतांनी अज्ञान, भेदभाव आणि विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला. या शतकात समाज-प्रबोधन खूप झपाट्याने झाले. एक वेगळ्या प्रकारचे ते शिक्षण होते. योग्य प्रश्न निर्माण करायचे आणि अत्याचाराविरुद्ध आवाज उठवायचे कामदेखील यामुळेच होऊ शकले. छत्रपती शिवाजीमहाराजांचे विचार (स्वराज्य) प्रेरणा आणि आधार देणारे होते. यामुळे खूप लोकांना जीवन जगण्यासाठी उमेद आणि बळ प्राप्त झाले.

5) **शिक्षणप्रणाली : ब्रिटिश**

सतराव्या शतकानंतर काही राजसत्तांनी भारतात प्रवेश केला, पण काहींनी आपल्यावर साम्राज्य गाजवण्यासाठी केला. याचा परिणाम भारतीय शिक्षणप्रणालीवर झाला. भारतातील शिक्षण भारतीय राहिले नाही. भारतात पाश्चिमात्य विचारांना वाव देणाऱ्या शिक्षणाची सुरुवात झाली. ब्रिटिशांनी शिक्षणाद्वारे भारतीयांवर हुकुमत गाजवण्यास सुरुवात केली. जरी वरवर हे शिक्षण पुढारलेल्या विचारांना वाव देणारे वाटत असले तरी ही संकुचित वृत्ती होती आणि भारतीयांविषयी आकस निर्माण करणारी होती. शिक्षणाद्वारे भारतीयांचा उद्धार करण्यासाठी ब्रिटिश शिक्षणाचे प्रयोजन नव्हते. भारतीय संस्कृतीपासून भारतीयांना तोडण्याचा हा ब्रिटिशांचा एक डाव होता. ब्रिटिशांना भारतीय जनतेविषयी राग, अनास्था होती.

6) **भारतीय शिक्षण हरवले:**

ब्रिटिशांच्या काळात भारतीय शिक्षण आणि विचारांना हेतूपूर्वक वगळण्यात आले. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले तरी त्यानंतर ब्रिटिश विचारांच्या प्रभावाखाली भारतातील काही संघटना होत्या.. जरी बाह्य स्वरूपात साक्षरतेवर भर देण्यात आला, भारतीय शिक्षण सुधारण्यासाठी चर्चा, परिसंवाद झाले हे खरे, पण या सर्व प्रवासात प्राचीन भारतीय शिक्षणाचे महत्त्वाचे पैलू गळून पडले. वेगवेगळ्या शिक्षणआयोगांनी शिक्षण सुधारण्यासाठी सूचना दिल्या, पण त्या सर्वांनी शिक्षणपद्धतीत केलेल्या बदलांनी काही विशेष परिणाम झाला नाही. जरी शिक्षण समृद्ध करण्यासाठी तंत्रज्ञान / शैक्षणिक धोरण बांधले गेले तरी कुठेतरी अपेक्षित अंमलबजावणी झालीच नाही. शिक्षणाचा संबंध भारतीय मनाशी तुटायला सुरुवात झाली. विज्ञान, तंत्रज्ञानातील प्रगती, पर्यावरणाचे रक्षण का करावे इ. या शिक्षणामुळे त्यांना वेगळ्या दृष्टिकोनातून जगाचे आकलन झाले आणि विचारांची देवाणघेवाण सुरू होती. परंतु भारतीय शिक्षणाचा सांधा हलला होता. त्यामुळे शिक्षणाचा प्रवाह प्रभावीपणे वाढला. परंतु उत्तम

माणूस निर्माण करण्याची त्याची कुवत हळूहळू कमी होताना दिसली. भारतीय संस्कृती / विचार / भाषा / खेळ या सगळ्यापासून दूर झाली. एक चांगला माणूस निर्माण करण्याची शिक्षणाची कुवत हळूहळू कमी होताना दिसली. भारतीय संस्कृती / विचार / भाषा / खेळ या सगळ्यांपासून दूर झाली; पार हरवून गेली. याचा परिणाम सुशिक्षित समाजावर दिसू लागला. भारतातील सुशिक्षित समाज नोकरीउद्योगात, संशोधनात, राजकारणात जरी गुंतलेला दिसला तरी काही भारतीय सोडले तरी इतरांची विशेष छाप समाजावर दिसलीच नाही. जरी राजकारणात वेगवेगळे प्रयोग होताना दिसले, नवीन विचारप्रवाह भारतात निर्माण होताना दिसत असले तरी ते परिपूर्ण नव्हते. या सर्व प्रक्रियेमधील महत्त्वाचा घटक कुठेतरी हरवलेला दिसतो.

सुसंस्कृत आणि सात्त्विक विचारांना दिशा देणारे शिक्षण ही काळाची गरज आहे. शिक्षणाची वीण भारतीय तत्त्वज्ञानाशी पक्की करणे जरुरीचे आहे. नवीन शैक्षणिक धोरण 2020च्या द्वारे याचेच संकेत आपल्याला मिळत आहेत. ते संकेत नेमके कोणते आणि त्यातून शिक्षकांकडून नेमक्या काय अपेक्षा आहेत? या नवीन धोरणामुळे शिक्षकाच्या भूमिकेत आमूलाग्र बदल अपेक्षित आहेत. तसे शिक्षणसंस्थांशी संबंधित वेगवेगळ्या व्यक्तींमध्येही तो बदल अपेक्षित आहे. नवीन शैक्षणिक धोरण 2020नुसार प्रस्थापित झालेली भारतीय तत्त्वज्ञानाची बैठक विशेष आहे. जीवनमूल्ये आणि जीवनाचा दृष्टिकोनाची श्रीमंती वाढविणारे हे धोरण आहे.

‘Every nation has its own personality. The set of institutions, virtues, rights and duties peculiar to it constitute its individuality, its unique personality..’ [2]

## III. नवीन शिक्षणपद्धती : भारतीय तत्त्वज्ञान आणि मूल्याधारित दृष्टिकोन

नवीन शैक्षणिक धोरण 2020चा भक्कम पाया भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती आणि त्या संदर्भातील ज्ञानाशी / जीवन-अनुभवांशी निगडित आहे. हे शैक्षणिक धोरण गतकाळातल्या शैक्षणिक धोरणांमधील काही महत्त्वाचे विचार सामावून घेणारे नक्की आहे. त्या नवीन शैक्षणिक धोरणाचे वैशिष्ट्य म्हणजे ते भारतीय शिक्षणाचे महत्त्व प्रस्थापित करणारे आहे. म्हणजेच ते केवळ भंपक राष्ट्रीय प्रेमाला वाव देणारे नाही. तर भारतीय शिक्षणाचे नेमके शास्त्रीय तत्त्वज्ञानाशी निगडित भाषेशी संबंधित, शरीरमनाच्या उन्नतीला महत्त्व देणारे, व्यक्ती आणि समाजाच्या जडणघडणीत वैचारिक दृष्टिकोन निर्माण करणारे, प्रेम, शांती, दया, आस्था, न्याय, समता इ. जीवनमूल्यांचे महत्त्व प्रस्थापित करणारे आहे. भारतातील वेगवेगळ्या प्रदेशातील निसर्गसौंदर्य आणि पर्यावरण-संवर्धनाचे महत्त्व पोचवणारे शिक्षण म्हणजेच भारतीय शिक्षण.. कला, कौशल्य आणि सामाजिक बांधिलकी वाढविण्यासाठी योग्य मार्ग दाखविणारे हे धोरण आहे.

महान व्यक्तींच्या शिक्षणविषयक विचारांचा समावेश भारतातील शिक्षणव्यवस्थेत कुठेही अधोरेखित झालेला दिसत नाही. शिक्षण आयोगातील काही महत्त्वाचे विचारांचा समावेशदेखील फार प्रमाणात दिसत नाही. परंतु या सगळ्या परिस्थितीत शिक्षणविषयक विचारप्रवाह आणि प्रयोग एका वेगळ्या प्रकारे विकसित झाले आहे. या शाळांमध्ये शिक्षण सुरू होते आणि आहे. नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये भारतीय विचारवंतांच्या विचारांचा समावेश आहे.

हे प्रयोजन नवीन शैक्षणिक धोरणातून सुस्पष्ट होताना दिसते. जागतिकीकरणाचा विचार, वैविध्याला भिन्नतेला सामावून घेणाऱ्या विचारांचे संस्कार त्यात दिसतात. प्राचीन भारतातील विचारवैभव, वर्तमान भारतातील काही विशेष पैलू उत्तम भविष्य घडविण्यासाठी कसे महत्त्वपूर्ण ठरू शकेल हेही या शैक्षणिक धोरणात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे नमूद झाले आहे.

भौतिक जीवनाचे कुतूहल उत्तम संशोधनाने कमी करता येईल आणि भौतिक सुखाकडे वाढलेला कल योगाभ्यासामुळे नियंत्रणात ठेवता येऊ शकतो. विज्ञानाची प्रगती महत्त्वाची आहेच. त्याहून विशेष आहे माणसाच्या सकारात्मक विचारांची प्रगती. व्यक्तिस्वातंत्र्य, स्वविषयी जागरूकता, संवाद, साधना, सेवा याचे महत्त्वदेखील भारतीय शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकते. यामुळेच व्यक्तिमत्त्व प्रभावशाली करण्यास यश नक्की मिळेल. राष्ट्राच्या बांधणीतदेखील याचा उत्तम उपयोग होऊ शकेल. हल्ली राष्ट्रप्रेमात समाविष्ट भंपकपणा दूर होईल. विशेष म्हणजे राष्ट्रप्रेम म्हणजे देशाविषयी आपली कर्तव्ये योग्यप्रकारे पार पाडणे. भ्रष्टाचारमुक्त आणि अंधश्रद्धामुक्त भारत – आपण निश्चित घडवू शकू. विद्यार्थ्यांमधील षड्रिपूंवर विजय मिळवण्यासाठी भविष्यात भारतीय शिक्षणाची मदत होऊ शकते.

भारतातील नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वाचे आहे. या शोधनिबंधात या शैक्षणिक धोरणाच्या काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली आहे. ही चर्चा भारतीय तत्त्वज्ञानाच्या काही महत्त्वाच्या पैलूंवर आधारित आहे. ही चर्चा भारतीय तत्त्वज्ञान आणि भारतीय शिक्षण यांचा परस्परसंबंध किती महत्त्वाचा आहे हेही त्यातून व्यक्त करण्याचा हा प्रयत्न आहे. भारतात भारतीय शिक्षणाची परंपरा जपण्याचा प्रयत्न गेली अनेक शतके सुरूच आहे. यामुळेच वेगवेगळ्या शतकात भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती आणि विचारांवर आधारित शिक्षणविचार थोड्याफार प्रमाणात समृद्ध झाले आहे.

भारताच्या 75 वर्षांच्या स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शिक्षणावर विचार आणि त्या संदर्भातील अनेक प्रयोग, उपक्रमही याच काळात प्रगल्भ झाले. एक वेगळा विचार मांडण्याची शक्ती काही तत्त्वज्ञ / विचारवंत / स्वातंत्र्यसैनिकांच्या विचारांतून आपल्याला दिसते. म्हणजेच भारतीय शिक्षण समृद्ध करण्याचे कार्य गेली अनेक शतके सुरू आहे. याचे वेगळेपणे हे की, राष्ट्रीय शैक्षणिक प्रगतीच्या प्रवाहावर जास्त टीका न करता त्या विशिष्ट व्यक्तींच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनावर विचारमंथन आणि प्रयोग सुरू झाले. हे देखील भारतीय विचार आणि संस्कृतीशी निगडित आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हा भारताच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून येणा ऱ्या अनेक शतकांसाठी महत्त्वाचा दस्तावेज असेल.स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, योगी अरविंद, जे. कृष्णमूर्ती, महात्मा गांधी या तत्त्वज्ञांनी शिक्षणविषयक विचार आणि प्रयोग खूप प्रेमाने आणि आस्थेने व्यक्त केले आहेत.

1) **दिव्यत्व – पूर्ण क्षमता वापरणे महत्त्वाचे:**

भारतीय तत्त्वज्ञानात विशेषकरून वेदान्त विचारांद्वारे दिव्यत्वावर खूप सखोल चर्चा सुरू आहेच. आंतरिक प्रवास दिव्यत्वाच्या प्रचीतीसाठी महत्त्वाचा आहे.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

'Going to highlight the essence of the Vedic religion (Dharma) Vivekanand speaks of its availability within every person in the form of God. Dharma makes humans aware of, their identical sustaining principle.' [3]

स्वामी विवेकानंदांच्या जीवन तत्त्वज्ञानात याविषयी चर्चा आणि दृष्टिकोन सुस्पष्ट आहे. स्वामी विवेकानंदांच्या शिक्षणविषयक विचारांद्वारे ते दिव्यत्वावर चर्चा करतात, म्हणजेच आपल्यामधील क्षमता अधिक प्रमाणात वाढविण्यासाठी प्रेरित करतात. Each soul is potentially divine या विचारामध्ये परिवर्तनशील जीवनाचे सार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (प्रस्तावना) पहिल्या वाक्यात याची पुन्हा प्रचीती येते.

'मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी समाज आणि न्याय्य समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे.' [4]

**२) रवींद्रनाथ टागोर यांचे शिक्षणविषयक विचार:**

रवींद्रनाथ टागोर यांचे तत्त्वज्ञान भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून प्रभावी आहेत. त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन अत्यंत व्यापक तर आहेच, त्याहून महत्त्वाचे म्हणजे निसर्ग आणि माणसामधील नाते घट्ट करण्यासाठी आहे. निसर्गाच्या सान्निध्यात शिक्षण – शांतिनिकेतन म्हणजे विश्वभारती विद्यापीठ म्हणजेच मुक्त शिक्षण आणि जीवनमूल्य जोपासणारे शिक्षणविषयक दृष्टिकोन त्यातून अभिप्रेत आहे. कुठल्याही एकाच दृष्टिकोनातून विचार करणे, इतर विचारांविषयी ऐकून घेणे इ. महत्त्वाचे आहे. पण हा विचार मनाला संवेदनशील करणे हेदेखील तेवढेच महत्त्वपूर्ण आहे.

'भारत विकसित देश होण्याकडे वाटचाल करत असताना, तसेच जगातील सर्वांत मोठ्या तीन अर्थव्यवस्थांपैकी एक होत असताना मानव्यशास्त्रे आणि कलेची मागणी वाढत जाईल.' [5] शिक्षणाद्वारे संवेदनशील विचार, दृष्टिकोन निर्माण करणे हेही तेवढेच आवश्यक आहे.

**३) शिक्षणप्रक्रिया – योगी अरविंद यांचा शिक्षणविषयक विचार:**

शिक्षण म्हणजे केवळ माहिती देणे नव्हे तर विचारांचे आदानप्रदान हे महत्त्वाचे कार्य आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाच्या कक्षा रुंदावणे. शरीर, मन, बुद्धी यांचे नाते घट्ट करण्याचे. आत्मिक दृष्टिकोन अधिक सखोल करण्यावर भर देणे महत्त्वाचे आहे. योगी अरविंद यांच्या शिक्षणविषयक विचारांचे उगमस्थान वेद, उपनिषदे आणि भारतीय दर्शनशास्त्राचे विचारांचे सार आहे. त्यामुळेच शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यावर विस्तृत चर्चा – त्यावर स्पष्टीकरण भारतीय तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे कार्य आहे. अज्ञान दूर करणे आपल्या अंतिम लक्ष्यापर्यंत पोहोचणे, स्वतःबरोबर निवांत वेळ घालविणे / रमणे हेही या प्रक्रियेत शिक्षण हळुवारपणे जोपासणारे आहे. त्यामुळेच आत्मिक जीवनाचे व्यावहारिक जीवनाशी नाते दृढ करणे महत्त्वाचे आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यातून मानवी जीवन अधिक समृद्ध बनविण्याचा एक प्रयत्न आहे.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

'प्राचीन आणि सनातन भारतीय ज्ञान आणि विचारांची समृद्ध परंपरा लक्षात घेऊन हे धोरण तयार करण्यात आले आहे. भारतीय विचार आणि तत्त्वज्ञानात ज्ञान, प्रज्ञा आणि सत्याचा शोध ही नेहमीच मानवाची सर्वोच्च उद्दिष्टे मानली जातात. प्राचीन भारतीत शिक्षणाचे लक्ष्य या सांसारिक जीवनाची तयारी किंवा शाळेनंतरच्या जीवनाची तयारी म्हणून ज्ञान मिळविणे एवढेच नव्हे तर पूर्ण आत्मज्ञान किंवा मोक्ष होते.' [6]

४) **पुरुषार्थ आणि प्रगती:**

नवीन शैक्षणिक धोरण 2020 हे ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान यांचा योग्य मिश्रित दृष्टिकोन आहे. माणसाची 'स्व'ची प्रगती महत्त्वाची आहे आणि समाजाची / राष्ट्राची प्रगती ही महत्त्वाची आहे. ऐहिक प्रगती आणि नैतिक प्रगतीदेखील महत्त्वपूर्ण आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष याच्यावर सूक्ष्म चिंतन शिक्षण विचारांमधून दिसते. बदलत्या काळाची आव्हाने पेलताना संयमदेखील महत्त्वाचा आहे, हेही या नवीन शैक्षणिक धोरणातून अधोरेखित केले आहे. पैसा आणि सत्ता याच्या आधीन न जाता – स्वत:मध्ये आणि समाजात परिवर्तन घडवून आणणे हे उत्तम शिक्षणाचे ध्येय आहे. भारतात सेवा, साधना, संघटित राहण्याच्या वृत्तीमुळे ते अधिक स्पष्ट होते. मूल्याधारित जीवनाची खरी कसोटी आजच्या यांत्रिक आणि ऐहिक जीवनामुळे तीव्र झाली आहे. जीवनमूल्ये जीवन-अनुभवांच्या मार्गातून अधिक घट्ट कशी करता येतील याचेही मार्गदर्शन शिक्षणसंस्थांमध्ये आवश्यक आहे.

'या शिक्षणसंस्थेचा हेतू तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेल्या आणि (सहृदयता) करूणा, सहानुभूती, धैर्य आणि चिकाटी, विज्ञानाधिष्ठित कल व रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी आणि मूल्ये असलेल्या चांगल्या व्यक्ती विकसित करणे असा आहे. याचा उद्देश आपल्या घटनेद्वारे परिकल्पित न्याय्य, सर्वसमावेशक आणि बहुलतावादी समाजाच्या निर्मितीत सहभाग घेणारे, कार्यक्षम आणि चांगल्या प्रकारे योगदान देणारे नागरिक तयार करणे असा आहे.' [7]

५) **योगतत्त्वज्ञानाचा प्रभाव:**

'शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ आकलनात्मक विकास करणे एवढेच नसून, चांगले व्यक्तिमत्त्व घडवणे आणि एकविसाव्या शतकातील प्रमुख कौशल्ये आत्मसात केलेल्या अशा समग्र व अष्टपैलू व्यक्ती निर्माण करणे हे देखील असेल. अखेरीस ज्ञान हा एक गहिरा खजिना आहे आणि शिक्षण हे एखाद्या व्यक्तीमध्ये आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या परिपूर्णतेच्या रूपात ज्ञानाची अभिव्यक्ती होण्यास मदत करतं..' [8]

योग तत्त्वज्ञानामुळे विचार, कृती, मूल्य आणि परिवर्तनशील जीवनाविषयी जागरूकता सहज शक्य होते. सात्त्विक विचार आणि कृती जोपासण्यासाठी शिक्षणाद्वारे वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी वाव या नव्या शैक्षणिक धोरणात आहे. विवेकबुद्धीचे महत्त्व वेगवेगळ्या गोष्टींमधून वर्गातील वेगवेगळ्या उपक्रमांतून जोपासणेही सहज शक्य आहे.

शांती (आंतरिक) आणि बाह्य जीवनातली किती महत्त्वाची आहे हेही त्यातून निश्चित व्यक्त होऊ शकते. योग-दृष्टिकोनामुळे

ISSN–2277- 8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022
OPEN ACCESS Original Research Article

आचार, विचार, व्यवहारात सुसंगती निर्माण करायला मदत होऊ शकते. योग-दृष्टिकोनामुळे सातत्य, स्वातंत्र्य, 'स्व'ची ओळख याची अनुभूती शक्य आहे.

### IV. नवीन शिक्षण प्रणाली २०२० : अंमलबजावणीत तत्त्वज्ञानातील शिक्षकांचे अपेक्षित योगदान

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील विचार खूप महत्त्वपूर्ण आहे. देशाला आणि जगाला दिशा देणारे आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची 2020ची अंमलबजावणी सर्वात महत्त्वाची आहे. शिक्षकांचे योगदान या प्रक्रियेत महत्त्वाचे आहे. तत्त्वज्ञानाच्या शिक्षकांचे योगदानदेखील महत्त्वपूर्ण ठरू शकेल. या संदर्भात तीन महत्त्वाचे मुद्दे यांनी दिल्याप्रमाणे आहेत.

**1) परिवर्तनशील जीवन – महत्त्व:**

शालेय आणि इतर शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, त्याचे महत्त्वाचे पैलू आणि त्याचे स्पष्टीकरण आवश्यक आहे. या धोरणाची अंमलबजावणी करणे म्हणजेच विद्यार्थ्यांवर किंवा शिक्षकांवर, पालकांवर काही लादण्याचा प्रयत्न नाही. परिवर्तन म्हणजे नेमके काय? याचे योग्य मार्गदर्शन देणे आवश्यक आहे. हे परिवर्तन शरीर, मन, बुद्धी आणि सर्वांगीण विकासाशी निगडित आहे. ते कसे? याचे महत्त्व भारतीय तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने अधोरेखित करणे ही तत्त्वज्ञानाच्या शिक्षकांची जबाबदारी आहे.

**२) अध्ययन, अध्यापन आणि मूल्यांकन यांची सांगड:**

भारतीय तत्त्वज्ञान हा गाभा ठेवून अध्ययन, अध्यापन आणि मूल्यांकन यांची सांगड घालता येऊ शकते. नवीन शैक्षणिक धोरण प्रभावशाली आणि प्रगतिशील होण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. तत्त्वज्ञानाचे शिक्षक हे इतर शिक्षकांना योग्यप्रकारे यावर मार्गदर्शन करू शकतील.

**३) मूल्याधारित शैक्षणिक धोरण आणि व्यक्ती आणि राष्ट्राचा विकास:**

तत्त्वज्ञानाचे शिक्षक इतर शिक्षकांना व्यक्ती आणि राष्ट्राविषयीच्या कर्तव्यांची जाणीव करून देऊ शकतील. यामुळे शिक्षकांवर आणि विद्यार्थ्यांवर सकारात्मक परिणाम होईल हे निश्चित..

'In Aurobindo's philosophy, Becoming is equally real as Being however, he goes on to add : The creation adds nothing to the Infinite, it remains after creation What it was..' [9]

**संदर्भ:**

➢ Sarma, M.S. Srinivasa, The Philosophy of Education (Edited and compiled by R. Swarnalata)
➢ Chennai : TR Publications, 2009, ISBN 81-8286-009-1. (page 96)
➢ Sarma, M.S. Srinivasa, The Philosophy of Education (Edited and compiled by R. Swarnalata)
➢ Chennai : TR Publications, 2009, ISBN 81-8286-009-1. (page 96)
➢ Chattopadhyaya, D.P. 'The concept of Dharma in Vivekananda, Tagore and Sri Aurobindo – Social Science Research Journal, Vol.5.No.3. Chandigarh : Punjab University 1997 (page 14)

- राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 – शिक्षण मंत्रालय, भारत सरकार – पृष्ठ 3
- राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 – शिक्षण मंत्रालय, भारत सरकार – पृष्ठ 3
- राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 – शिक्षण मंत्रालय, भारत सरकार – पृष्ठ 4
- राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 – शिक्षण मंत्रालय, भारत सरकार – पृष्ठ 15
- Joshi R.V. - Social Science Research Journal, Vol.5.No.3. Chandigarh : Punjab University 1997 (page 67)

**Cite This Article:**
*डॉ. प्रिया मंगेश वैद्य, (2022)* नवीन शैक्षणिक धोरण २०२० – मूल्यशिक्षण आणि तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 50-61.*